# दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष–२ ■ अंक–१३ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ३१ ऑक्टोबर २०२२ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

# ठाणे जिल्ह्यातील ६ महानगरपालिका आणि नगरपालिका मधील लाखो झोपडपट्टी धारकांना दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घ्यावा!

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत क्लस्टरच्या धर्तीवर सुधारणा आवश्यक

## भाजपचे कृष्णा पाटील यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन केली मागणी!



## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतही वन प्लस घरांना क्लस्टर प्रमाणे घरे मिळावीत,पाटील यांचा आग्रह

ठाणे: – ठाण्यातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये क्लस्टरच्या धर्तीवर समानता आणल्यास याचा फायदा जिल्ह्यातील ६ महानगरपालिका व नगरपालिका मधील लाखो झोपडपट्टी धारकांना होईल असे सांगत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत क्लस्टर च्या धर्तीवर समानता आणा अशी मागणी भाजपचे कृष्णा पाटील यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन केली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतही वन प्लस घरांना क्लस्टर प्रमाणे घरे मिळावीत,त्यामुळे झोपडपट्टी मद्धे राहणाऱ्या नागरिकांना देखील न्याय मिळेल असे कृष्णा पाटील यांनी म्हटले आहे.

सध्या ठाण्यामध्ये क्लस्टर योजनचे काम सुरु आहे. यातून ठाणेकरांना खूप मोठा फायदा होणार आहे. त्याच बरोबर एसआरए प्रकल्पही सुरु आहेत. या दोन्ही योजना झोपडपट्टीधारक तसेच अनधिकृत घरांमध्ये वास्तव्य करणाऱ्यांसाठी मोठया वरदान दायक आहेत. यातील क्लस्टर मध्ये सहभागी होणाऱ्यांचा लाभ एसआरए प्रकल्पातील झोपडीधारकांना होत नाही असे कृष्णा पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.या निवेदनात पाटील यांनी शासनाला काही सूचना केल्या आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून झोपडीधारकांना ३०० चौ.फूट क्षेत्रफळाचे तर क्लस्टरमध्ये ३२५ चौ.फुटाचे घर मिळते. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून फक्त तळमजल्या वरील झोपडीधारकाला घर मिळते तर क्लस्टरमध्ये तळ अधिक वरील कितीही मजल्याच्या बांधकाम धारकाला घर मिळते. पात्रतेच्या निष्कर्षामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून इ.स. २००० पूर्वीच्या पात्र लाभार्थ्यांना मोफत व १ जानेवारी २०११ पर्यंतच्या लाभार्थ्यांना ठराविक रक्कम भरून पात्र करण्यात येते. मात्र क्लस्टरमध्ये सुरुवातीला २०१४ पर्यंतच्या लाभार्थ्यांचा समावेश होता तो आता २०१९ पर्यंत करण्यात आला आहे. तसेच यासाठी विशेष अटींचाही समावेश नाही. याच अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मध्येही हे नियम लागू करण्यात यावे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून अनेकदा वेगवेगळे परिपत्रक काढण्यात येत असतात, मात्र ते प्राधान्याने मुंबईसाठीच काढण्यात येतात. त्याचा ठाणेकरांना लाभ होत नाही किंबहुना ते परिपत्रक ठाण्यात लागू होण्यासाठी दोन ते तीन वर्षांचा कालावधी जात असतो. त्यामुळे जे परिपत्रक मुंबईसाठी निघेल तेच त्याच वेळी ठाण्यातही लागू करण्यात यावे अशा महत्वपूर्ण सूचना कृष्णा पाटील यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात केल्या आहेत.

या दोन्ही योजनांचा लाभ हा प्राधान्याने सर्वसामान्य गरीब नागरिकांसाठी आहेत. त्यामुळे या दोन्ही योजनांचे पात्रता निकर्ष, क्षेत्रफळ व नागरिकांनी गरजेपोटी बांधलेल्या एक मजल्याचे बांधकाम समाविष्ट केल्यास याचा झोपडीधारकांना लाभ होऊ शकतो.

सदर पत्रावर विचार करून ठाण्यातील समस्त झोपडीधारकांना उपकृत करावे अशी विनंती ठाणेकरांच्या वतीने कृष्णा पाटील यांनी केली आहे.

> *क्लस्टर मध्ये घरे मिळणारे व झोपडपट्टी मध्ये राहणारे ही सर्वसामान्य जनता आहे.या सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळावा म्हणून क्लस्टर आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समानता आणून झोपडपट्टी धारकांनाही एक अधिकच्या घरांना पात्र समजावे.जनतेला न्याय मिळावा ही माझी भूमिका आहे.*
>
> – कृष्णा पाटील,
> माजी नगरसेवक
> भारतीय जनता पार्टी



# ठाण्यात एसटीच्या बसला आग

## प्रवासी सुखरूप



**ठाणे :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसच्या स्टार्टरमध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याची घटना शुक्रवारी सकाळी ९ वाजून ४९ मिनिटांच्या सुमारास समोर आली. या बसमधून प्रवास करणाऱ्या सुमारे-७० प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात यश आले असून बसला लागलेली आग बसमधील चालक, वाहक, स्थानिक रहिवाशी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने तातडीने नियंत्रणात आली आहे.

ठाणेकडून भिवंडीला जात असलेली महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ भिवंडी डेपोची बस चक १४ इढ १८९७ ही बस चालक आनंद विठोबा सवारे आणि वाहक गणपत बाबुराव बिराजदार हे दोघे ७० प्रवासी घेऊन निघाले होते. बस टेंभीनाक्यावर येताच बसच्या स्टार्टरमध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागली. स्थानिक माजी नगरसेवक सुधीर कोकाटे यांनी तातडीने याची माहिती ठाणे महापालिका प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाला दिली. तर बस चालक वाहक आणि स्थानिक नागरिकांनी बसमधील सुमारे ७० प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल झाल्यावर आगीवर तातडीने नियंत्रण मिळविले. वेळीच ही बाब लक्षात आल्याने मोठे अनर्थ टळले.

## ठाणे झेडपीच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत सीईओंची अनोखी दिवाळी भेट

**ठाणे :** ठाणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात काम करणाऱ्या आठ आरोग्य सेवकांना पदोन्नती तर एका सफाई कर्मचाऱ्याच्या वारसा असलेल्या पत्नीला सफाई कामगार या पदावर नियुक्ती देत, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी (सीईओ) मनुज जिंदल यांनी दिवाळीच्या पूर्वसंध्येला अनोखी दिवाळी भेट दिली.

ठाणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गेल्या अनेक दिवसांपासून पदोन्नती देण्याबाबतची प्रक्रिया सुरु होती. यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) अविनाश फडतरे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी मेहनत घेतली.

अखेर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात आरोग्य सेवक या पदावर काम करणाऱ्या आठ कर्मचाऱ्यांना आरोग्य सहाय्यक पदावर नियुक्ती देण्यात आली. तर, दुसरीकडे आरोग्य विभागात काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याने त्याचा वारसाला लाड -पागे समितीअंतर्गत सफाई कामगार या पदावर नियुक्ती आदेश देण्यात आले. अशी माहिती झेडपी प्रशासनाने दिली.

## ठाण्यात पुन्हा गोळीबार; हवेत गोळीबार करणाऱ्या सुरक्षा रक्षकाला अटक

**ठाणे:** ठाणे शहरात एकाच दिवशी काही तासांच्या अंतरावर गोळीबाराच्या दोन घटना ताज्या असताना,मुंब्रा देवी कॉलनी येथे लक्ष्मीपुजनाच्या दिवशी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास हवेत २ राउंड फायर झाल्याची बाब समोर आली. त्या प्रकरणी एका बँकेचा सुरक्षारक्षक असलेल्या केदारनाथ अलगु राजभर (६६) याला ताब्यात घेतले असून त्याने राउंड फायर केल्याची कबुली दिल्याची माहिती मुंब्रा पोलिसांनी दिली. तसेच ही घटना व्हायरल झालेल्या एका व्हॉटसअप मॅसेजमुळे समोर आल्याचे ही पोलिसांनी सांगितले.

२६ ऑक्टोबर रोजी मनोज साळवी यांच्या वाढदिवसानिमित्त मनोज साळवी, मनोज गौड, चंदन दुबे, विकास तिवारी, राजेश श्रीवास्तव, राजेश सिंग, कमल सिंग यांनी मुंब्रा देवी कॉलनी, जेडी स्कूल समोर शिवसाई मंदीर, श्लोकनगर, फेस २, येथे लक्ष्मी पुजनाच्या दिवशी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास हवेमध्ये २ राउंड फायर केले, अशा स्वरूपाचा व्हॉटसअप मेसेज व्हायरल होत होता. ही बाब गंभीर असल्याने मुंब्रा पोलिसांनी तातडीने चौकशी सुरू केली. त्यावेळी केदारनाथ राजभर याने परवानाधारक १२ बोअर बंदूक मधून लक्ष्मीपुजन दिवशी म्हणजे २४ ऑक्टोबर रोजी ८ ते ८.३० वाजण्याच्या सुमारास ०२ राउंड उत्सवानिमित्त राहत्या घराच्या बाहेर येवून फायर केले होते. याचा त्या परिसरातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी पाहिलेले आहे. तसेच केदारनाथ याने देखील ते कृत्य त्यांनी स्वतः लक्ष्मीपुजन निमित्त उत्सवाच्या भरात केल्याची कबुली दिली आहे. याप्रकरणी केदारनाथ याच्यावर भादंवि कलम ३३६ सह शस्त्र (सुधारणा) अधिनियम २०१९ कलम २५(९) प्रमाणे मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला असून त्याला ताब्यात घेण्यात आलेले आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली. साळवी यांचा वाढदिवस २२ ऑक्टोबरला होता. २४ ऑक्टोबरला लक्ष्मीपूजन होते. २६ ऑक्टोबरला मॅसेज व्हायरल झाल्यावर पोलिसांनी तातडीने याचा छडा लावून एकाला ताब्यात घेतले. या घटनेत साळवी आणि सुरक्षारक्षक यांच्यात काही संबंध नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच मॅसेज कोणीतरी समाजकंटकांनी खोडसाळपणे केलेला असल्याचे दिसून येत. त्याचाही तपास मुंब्रा पोलीस करत आहेत.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.



## शीळ फाटा रोडवरील गोदामा बाहेरील भंगाराला आग ; दोन तासांनी आग आटोक्यात

**ठाणे:** शीळ फाटा रोडवरील खान कंपाऊंडमधील गोडाऊनच्या बाहेर ठेवलेल्या भंगाराला (प्लॅस्टिक मटेरीयल, पत्र्याचे सामान) आग लागल्याची घटना गुरुवारी सायंकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास समोर आली. ही आग दोन तासांच्या शर्थीच्या प्रयत्नानंतर नियंत्रणात आणण्यात मुंब्रा अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले आहे. तसेच सुदैवाने या आगीत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

खान कंपाऊंडमध्ये आग लागल्याची माहिती मिळताच, मुंब्रा अग्निशमन दलाचे अधिकारी आणि जवान यांनी तातडीने धाव घेतली. तसेच आगीवर नियंत्रण मिळविण्यास सुरुवात केली. यावेळी एक रेस्क्यू वाहन, २-फायर वाहन, १-वॉटर टँकर पाचारण केले होते. त्या आगीवर २ तासांच्या शर्थीच्या प्रयत्नानंतर नियंत्रणात आणण्यात यश आले आहे. आग नेमकी कश्यामुळे लागली हे समजू शकलेले नाही. पण ही आग फटाक्यांमुळे लागली असावी असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# कळवा आणि भारत गिअरच्या पुलाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी करावे

**ठाणे:** लोकांची गैरसोय होत आहे, ती थांबवा; आपण जर पूर्वीप्रमाणे वागलो असतो तर आतापर्यंत पुलाचे उद्घाटन झाले असते. पण, मुख्यमंत्री ठाण्याचे आहेत; त्यांचा सन्मान झालाच पाहिजे, या मताचा मी आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी लवकरात लवकर कळवा आणि भारत गिअर या दोन्ही पुलांचे उद्घाटन करावे, असे आवाहनही माजी मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी केले.

पुलाबाबत विचारणा केल्यावर आव्हाडांनी 'आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती केली आहे की, लवकरात लवकर शिल्लक काम पूर्ण करुन पुलाचे उद्घाटन करा. मुंब्रा-कौसा येथील भारत गिअरच्या उड्डाणपुलाचे काम शंभर टक्के पूर्ण झाले आहे. त्याचेही उद्घाटन करुन घ्यावे. मुख्यमंत्र्यांचा सन्मान रहावा, अशी अपेक्षा आहे. हे दोन्ही पूल आपल्या मतदारसंघातील असून ते आपणच मंजूर करुन आणले आहेत. ही गोष्ट खरी आहे की, कळवा खाडीवरील तिसर्या पुलाला ठामपाने त्यास मदत केली; ठामपानेच निधी दिला आहे. भारत गिअर येथील पुलाचे काम एमएमआरडीएकडून झाले आहे; या सर्व गोष्टी बाजूला ठेवू या.पण, लोकांचे जे हाल होत आहेत ते तर संपवा. ते मुख्यमंत्र्यांच्या हातात आहे. त्यानंतर उगाच बोंबाबोंब करायची की जितेंद्र आव्हाडांनी आगाऊपणा केला आणि पुल खुला केला. आपणाला तसे करायचे नाही. आपण मोठ्या मनाने सांगत आहोत की पुलाचे काम पूर्ण झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी फक्त आपली गाडी पुलावरुन फिरवावी. कारण, लोकांना भाषणे ऐकण्याची फारकाही हौस असते अशातला भाग नाही. लाल फित लावलेली असेल ती कापा; फोटो काढा; आपल्या नावाची पाटी लावा; तो पूल कोणी करुन घेतला, याच्या मागे कोण आहे, हे लोकांना माहित आहे असे आव्हाड शेवटी म्हणाले.



**दिव्यातील लोकप्रिय माजी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या कार्यालयात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भाऊबीज सोहळा पार पडला. रविवारी सुमारे पाचशे महिलांनी शैलेश पाटील यांना भाऊबीज केली. दरवर्षी शैलेश पाटील यांना दिव्यातील असंख्य महिला राखी बंधन व भाऊबीज या दोन्ही सणांना ओवळत असतात.**

# टाटा-एअरबस प्रकल्पाचा महाराष्ट्राला टाटा!

## हे तर ठाकरे सरकारच्या कोलदांडा प्रवृत्तीचे पाप

**ठाणे :** सुमारे वर्षभरापूर्वीच गुजरातेत गेलेल्या एअरबस प्रकल्पावरून टीका करणे म्हणजे महाविकास आघाडी सरकारने महाराष्ट्राच्या जनतेशी केलेले पाप लपविण्याचा प्रकार आहे, अशी टीका भाजपाचे ठाणे शहराध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांनी केली आहे. ठाकरे सरकारने महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्राचे वाटोळे करून आता उलटा कांगावा सुरू केला आहे, असा आरोपही त्यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतील मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत संपूर्ण देशांतर्गत विमान निर्मितीच्या

### भाजप आमदार निरंजन डावखरे यांची टीका

या प्रकल्पासाठी ८ सप्टेंबर २०२१ रोजी मे. एअर बस आणि स्पेस एसए स्पेन यांच्यातील कराराला मंत्रिमंडळ सुरक्षा समितीने मान्यता दिली आणि लगेच २४ सप्टेंबर २०२१ रोजी संरक्षण मंत्रालयासोबत सामंजस्य करार करण्यात आला. एअरबस आणि टाटा यांच्यातील करारानुसार संयुक्तपणे उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पास संरक्षण मंत्रालयाने हिरवा कंदिल दाखविल्याचे रतन टाटा यांनी त्याच दिवशी जाहीरही केले. असे असताना सुद्धा हा प्रकल्प महाराष्ट्रात आणण्यासाठी एकही पत्र तत्कालिन महाविकास आघाडी सरकारने पाठविले नाही वा कोणता पाठपुरावा केला नाही. या वस्तुस्थितीची माहिती असताना निव्वळ दिशाभूल करण्याचे राजकारण आता तरी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी करु नये. मुद्यांवर बोलायचे असल्यास टाटा एअरबसला लिहिलेले एकतरी पत्र त्यांनी जाहीर करावे, असे आव्हान डावखरे यांनी दिले आहे. वेदान्ता-फॉक्सकॉन प्रकल्पाबाबतही ठाकरे सरकारने असाच बेजबाबदारपणा दाखवून तो प्रकल्प घालविला. या प्रकल्पातूनही वाटाघाटीद्वारे वसुलीचा छुपा हेतू तर नव्हता ना, अशी शंकाही डावखरे यांनी व्यक्त केला.

# परराज्यातील मद्याची वाहतूक करणारी दुकली जेरबंद

## ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**ठाणे :** परराज्यातून अवैधरित्या दमन निर्मिती मद्याची वाहतुक करणाऱ्या गणेश सौनी व निलेश अस्वार या दुकलीला ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाने जेरबंद केले. या दुकलीकडून ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश आले असून त्या दोघांना चार दिवसांची पोलीस कोठडी मिळाली असल्याची माहिती संबंधित विभागाने दिली.

सण उत्सवच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी ठाणे राज्य उत्पादन विभागाने कंबर कसली आहे. अशातच विदेशी मद्याची वाहतूकीबाबत राज्य उत्पादन विभागाला मिळालेल्या माहितीनुसार, राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कांतीलाल उमाप व ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक निलेश सांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या माहिती नुसार मुंबई- नाशिक हायवेवरील राजधानी धाबाजवळ नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या कूसका बोरिवली भिवंडी येथे छाप टाकून परराज्यातील दादरा नगर हवेली व दमणचा मद्याचा ४३ लाख एक हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये अँटीक्यूटी ब्ल्यू, मॅजिक मुमेंट, रॉयल चालेंज, रॉयल स्टग आदी विविध नामांकित ब्रांडच्या परराज्यातील दमणमद्यासह मद्याची वाहतूक करणारा १७ लाख रुपये किमतीचा टेम्पो एमएच ०४, केयु ५५१४ तसेच ३१० पुठ्ठ्यांचे बॉक्स आदींचा समावेश आहे. अटकेतील दुकलीला न्यायालयात हजर केल्यावर त्यांना ४ दिवसांची कोठडी सुनाविण्यात आली आहे. ही कामगिरी राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक निरीक्षक एन.एन.मोरे, दुय्यम निरीक्षक गोविंद पाटील आदी पथकाने केली.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, ३१ ऑक्टोबर २०२२



## बेळगाव सीमाभागातील मराठी जनतेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी न्याय द्यावा..!

**ठाणे:** बेळगाव,बिदर,भालकी, धारवाड,कारवारसह सीमाभागातील मराठी जनतेला महाराष्ट्रात सामावून घेऊन नव्याने संयुक्त महाराष्ट्र निर्माण करावा व तेथील मराठी जनतेला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी बेळगाव कुणाच्या बापाच पुस्तकाचे लेखक अर्जुन विष्णू जाधव यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा बेळगावातून सुरू झाला होता. बेळगाव सीमाभागातील मराठी जनता झाली साठ वर्षे महाराष्ट्रात येण्यासाठी संयुक्तपणे लढा देत आहेत. या लढ्यात त्यांच्या तीन पिढ्या बरबाद झाल्या आहेत. त्याचा हा लढा कर्नाटकी सरकार नेहमीच दाबण्याचा प्रयत्न करत आहे. तेथील आपल्या मराठी जनतेवर अमानुष मारहाण करत,छळत आहे. यातून त्यांना मुक्त करून आपल्या मराठी बांधवांना महाराष्ट्रात सामावून घेण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहावे हे आपल्या आयुष्यातील सर्वात मोठे यश असेल.

आपण ठाण्यातील काही निवडक शंभर शिवसैनिकासह स्वर्गीय आनंद दिघे साहेब यांच्या आदेशानुसार बेळगाव सीमा लढ्यात सहभागी झाला होता. तेव्हा तेथील कर्नाटकी पोलीसांचा अमानुष मारहाण ही आपण सहन करून बेळ्ळारी तुरुंगात चाळीस दिवस तुरूंगवास भोगला आहे. आपण कर्नाटक सरकारचा अगदीं जवळून मराठी जनतेवर होणारा अत्याचार, अन्याय पाहिला आहे. आपण या लढ्याला सदैव सहकार्य केले आहे. आता हा बेळगाव सीमा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात आहे तो लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत आणि बेळगावसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करावा . १ नोव्हेंबर हा दिवस बेळगाव सीमाभागातील मराठी जनता दरवर्षी काळा दिन म्हणून पाळत आहे. त्यांच्या न्याय द्यावा अशी परखड मागणी साहित्यिक अर्जुन विष्णू जाधव यांनी केली आहे.

## पुन्हा कल्याणात एफडीएची कारवाई; २७ लाख ६८ हजारांचा मावा जप्त



**ठाणे:** ठाणे अन्न व औषध प्रशासनाने पुन्हा एकदा कल्याण कारवाई करत, येथून दोन ट्रक मधून आणलेला २७ लाख ६८ हजार ९०० रुपये किंमतीचा माव्याचा साठा जप्त केला आहे. चार दिवसात कल्याणातील ही दुसरी कारवाई आहे.

दिवाळीच्या सणात प्रामुख्याने उपयोगात आणल्या जाणाऱ्या विविध अन्नपदार्थांचा गुणवत्ता व दर्जा यांची खात्री व खातरजमा करण्यासह सर्वसामान्य जनतेस सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्यातच सणासुदीच्या काळात मिठाईची मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने मात्र त्या प्रमाणात खव्याची उपलब्धता होत नसल्याने मागणी आणि पुरवठा यात समन्वय साधण्यासाठी व्यापाऱ्याकडून स्वीट, हलवा, बर्फी या नावाने खवा सदृश्य अन्नपदार्थाचे वितरण होत असल्याचे निर्दशनास येत असल्याने त्या अनुषंगाने २४ ऑक्टोबर २०२२ रोजी कल्याण, काळा तलाव येथील भवानी लॉन्स, येथे आलेल्या ट्रकमधून १७ लाख १९ हजार ३०० किमतीचा ४ हजार ४८७ किलो वजनाचा तर दुसऱ्या ट्रक मधून १० लाख ४९ हजार ६०० रुपये किंमतीचा ५ हजार २४८ किलो मावा किंवा मावा सदृश्य अन्नपदार्थ साठा जप्त केला. ही कारवाई कोकण विभागाचे सह आयुक्त सुरेश देशमुख यांच्या उपस्थितीत कोकण विभागातील अन्न सुरक्षा अधिकारी रामलिंग बोडके, माणिक जाधव, राजेंद्र कर्डक, भालचंद्र कुलकर्णी, वानरे तसेच कीर्ती देशमुख यांनी केली.

## एनआयसीयूच्या ३० खाटा आणि कोपरी प्रसूतीगृहातील आपत्कालीन सिझेरियन सुविधा एक महिन्याच्या आत सुरू करा

### ठामपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आरोग्य विभागास आदेश

**ठाणे : ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात एनआयसीयूच्या ३० खाटा आहेत. सध्या त्यापैकी काही खाटाच वापरात आहेत. या सर्व ३० खाटा एक महिन्याच्या आत सुरू करण्याचे आदेश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी आरोग्य विभागाला दिले. तसेच, महापालिकेच्या एकूण सहा प्रसूतीगृहांपैकी कोपरी येथील प्रसूतीगृहातील आप्तकालीन सिझेरियनची सुविधाही एक महिन्याच्या आत सुरू झाली पाहिजे, असे निर्देशही आयुक्तांनी दिले. त्याचबरोबर, कौसा – (एम. एम. व्हॅली) येथील हे सार्वजनिक–खाजगी तत्वावरील १०० खाटांचे रुग्णालय प्राधान्याने सुरू करावे,असे आयुक्तांनी आरोग्य विभागाच्या नुकत्याच झालेल्या आढावा बैठकीत स्पष्ट केले.**

या आढावा बैठकीला, उपायुक्त मनीष जोशी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. योगेश शर्मा, उप वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. स्मिताली हमरसकर, आरसीएच अधिकारी डॉ. राणी शिंदे, क्षयरोग आणि कोविड समन्वयक डॉ. प्रसाद पाटील, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. क्षमा शिरोडकर आदी उपस्थित होते.

#### प्रसूतीगृहांची विशेष काळजी घ्या

पालिकेच्या प्रसूतीगृहात एकूण किती प्रसूती होतात, त्यातील सिझेरियन किती होतात, याचा अहवाल आयुक्तांनी मागितला. त्याचबरोबर, सर्व प्रसूतीगृहात एनआयसीयू सुरू करण्याचे कालबद्ध उद्दिष्ट आयुक्तांनी आरोग्य विभागाला दिले. या प्रसूतीगृहात जागा नाही, असे शक्यतो होऊ नये. प्रसूतीसाठी आलेल्या महिलेला माघारी पाठविण्याची वेळ येऊ नये. तसेच, सिझेरियन किंवा मुदतपूर्व प्रसूती यांच्यासाठी त्यांना बाहेर जावे लागणार नाही याची काळजी घ्यावी. प्रत्येक प्रसूतिगृहात रुग्णवाहिका हवीच, असेही आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

#### रुग्णांशी सौजन्याने वागा!

महापालिकेच्या रुग्णालयात आलेल्या रुग्णांशी सौजन्याने वागणे हे आपले कर्तव्य आहे. रुग्णावर आवाज चढवला अशी तक्रार आली, तर त्याची गंभीर दखल घेतलीजाईल. त्याचप्रमाणे, रुग्णाने किंवा नातेवाईकांनी डॉक्टर किंवा कर्मचारी यांच्या गैरवर्तणूक केली तर तत्काळ पोलीस तक्रार करावी, असेही आयुक्तांनी नमूद केले.

#### रांगा कमी करा

रुग्णालयात आलेल्या रुग्णाला अनेक रांगांमधून फिरावे लागते. केस पेपरची रांग, ओपीडीची रांग, टेस्ट – सोनोग्राफी, एक्सरे, फार्मसी यांची रांग यातून रुग्णाला स्वतःला जावेलागते. गरोदर माता, वृध्दनागरिक यांची अशावेळी मोठी गैरसोय होते. त्यामुळे या रांगा कमी कशा करता येतील? जास्तीचे टेबल लावून, अधिक काऊंटर उघडून यातून मार्ग काढता येईल का, हे पाहण्यास आयुक्तांनी सांगितले.

#### उपचारासाठी बाहेर पाठविण्याची वेळ येऊ नये

महापालिकेच्या रुग्णालयात आलेल्या रुग्णाला उपचारासाठी बाहेर पाठविण्याची वेळ येणार नाही, याची दक्षता घ्यावी. अपवादात्मक परिस्थितीमध्ये बाहेर पाठवावे लागलेच तर, आपल्या रुग्णवाहिकेतून पाठवले जाईल. ज्या रुग्णालयात पाठवतो आहोत तिथे बेड उपलब्ध आहे, याची खात्री करूनच रुग्णाला पाठवावे, असे स्पष्ट निर्देश आयुक्त बांगर यांनी आरोग्य विभागास दिले.

#### १२ ते १८ वयोगटाचे लसीकरण

ठाण्यातील १२ ते १८ या वयोगटाचे १०० टक्के लसीकरण हे आपले लक्ष्य आहे. दिवाळीची सुटी संपल्यानंतर शाळांमध्ये टीम बनवून यावयोगटाचे लसीकरण लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. तसेच,कोरोनामुळे होत असलेल्या मृत्यूंच्या संख्येवर लक्ष ठेवून त्याचा अभ्यास सुरू ठेवण्यासही सांगितले.

#### वाडियातील लॅब लवकर सुरू करा

ठाणे शहराला आणखी एका मध्यवर्ती पॅथॉलॉजी लॅबची गरज आहे. त्यामुळे, सी आर वाडिया रुग्णालयातील लॅबची कामे ताबडतोब मार्गी लावण्यास प्राधान्य द्यावे. या मध्यवर्ती पॅथॉलॉजी लॅबमध्ये पालिकेची सर्व ३० नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, सर्व आपले दवाखाने यातून सॅंपल गोळा करून तपासणीसाठी येतील, असे आयुक्त म्हणाले. तसेच, शहरात ४० आपले दवाखाना आहेत. तेथे किती रुग्ण येतात,त्याचेकाम कसे सुरू आहे, याचाअहवाल देण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

> *आरोग्य विभागासाठी कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू देणार नाही. आरोग्य सेवा दर्जेदार आणि गतिमान असावी, एकाही रुग्णाला बेड अभावी माघारी जाण्याची वेळ येऊ नये, याची दक्षता घेण्यात येत आहे.*
>
> *– अभिजीत बांगर, आयुक्त, ठामपा*

# ये-जा करण्यासाठी तातडीने नाल्यावर पूल उभारण्याचा प्रश्न मार्गी लावू

## ४० वर्षांनी आले घरोघरी धो-धो पिण्याचे पाणी

**ठाणे: बृहन्मुंबई आणि ठाणे या दोन महापालिकेच्या सीमेवर वसलेल्या जुना तबेला या वस्तीमधील नागरिकांची तब्बल ४० वर्षांनी पिण्याच्या पाण्यासाठी होणारी पायपीट अखेर थांबली आहे. त्यांच्या घरात वीजेनंतर आता पिण्याचे पाणी ही घराघरात नळाद्वारे धो धो येऊ लागले आहे. आता या नागरिकांची सर्वात आवश्यक असलेली पाय वाटेची म्हणजे  नाल्यावरून ये– जा करण्यासाठी आवश्यक असलेला पूल उभारण्याबाबत ही राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून ते काम लवकरच मार्गी लावण्यात येईल असे आश्वासन स्थानिक माजी लोकप्रतिनिधी विकास रेपाळे यांनी दिले आहे. दरम्यान ,गुरुवारी उद्घाटन करण्यात आलेल्या पाण्याच्या पाईपलाईन प्रसंगी नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य हीच खरी कामाची पोचपावती असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.**



## नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य हिच खरी कामाची पोचपावती –विकास रेपाळे

दोन महापालिकांच्या सीमा वादामुळे कशिश पार्कच्या मागील बाजूस असलेल्या जुना तबेला या वस्तीमधील नागरिकांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत होती. हा सीमावाद मिटत नसल्याने दोन्ही महापालिका त्या नागरिकांना आपआपल्या महापालिकामध्ये समाविष्ट करू घेत नाही. मात्र तेथील नागरिकांच्या मागणीनुसार माजी स्थानिक नगरसेवक विकास रेपाळे आणि माजी नगरसेविका  नम्रता भोसले–जाधव यांच्या प्रयत्नाने महापालिकेच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आली. त्या टाकण्यात आलेल्या पाण्याच्या पाईपलाईनचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. मुंबई आणि ठाणे शहराच्या सीमेवर असलेली ही वस्ती कायमच उपेक्षित राहीलेली आहे. अनेक वर्षानंतर प्रथमतःच पाणी मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले होते. हिच खरी कामाची पोचपावती आहे असे रेपाळे यांनी सांगितले. तसेच या ठिकाणी आमच्या प्रयत्नाने लाईटचे खांब देखील उभारण्यात आले असून संरक्षक भिंतीचे कामही लवकरच पूर्ण केले जाणार आहे.तर या नागरिकांना आम्ही समाविष्ट करून घेतल्याने आता त्यांची ये जा करण्याची सर्वात महत्वाची मागणी म्हणजे नाल्यावरील पूल ही आहे. त्या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख व प्रवक्ते नरेश म्हस्के यांच्याशी चर्चा करून तो प्रश्न ही तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही रेपाळे यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित स्थानिक नागरीकांनी आमच्या कामाबद्दल आनंद व्यक्त केला. तसेच यंदा आमची खरी दिवाळी साजरी झाली, असेही स्थानिक नागरिकांनी यावेळी बोलताना सांगितले.

# हा तर महाराष्ट्राच्या अस्मिता, स्वाभिमान आणि प्रगतीवर फेकलेला दगड आहे

## डॉ. जितेंद्र आव्हाड यांची टीका

**ठाणे :** ज्या महाराष्ट्राने कोणालाही उपाशी झोपू दिले नाही. त्या महाराष्ट्रातील तरुणांना बेरोजगारीमुळे आता उपाशी झोपावे लागत आहे. राज्यातील उद्योग परराज्यात जात आहेत. त्यावर महाराष्ट्राच्या वेदना तीव्र आहेत.एवढे मोठे प्रकल्प जर महाराष्ट्राच्या घशातून ओढले जात असतील तर महाराष्ट्राची अस्मिता, स्वाभिमान आणि प्रगतीवर फेकलेला दगड आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा माजी मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी ठाण्यात पत्रकार परिषदेत टीका केली. फॉक्सकॉननंतर आता एअर बस प्रकल्प गुजरातला गेला आहे. याबाबत पत्रकारांनी विचारले असता, डॉ. आव्हाड यांनी ही प्रतिक्रिया दिली.

डॉ.आव्हाड म्हणाले की,  एअर बसबाबत आपण अनेक वर्ष ऐकत होतो. हा प्रकल्प महाराष्ट्रातच येणार होता. त्यासाठी जागेची निश्चिती करण्यात आली होती. पण, हा प्रकल्प महाराष्ट्रात ‘लँड’ होत असताना अचानक महाराष्ट्रातील कोणते हवामान खराब झाले, की ते अचानक गुजरातमध्ये लँड झाले, हे कळायला मार्ग नाही. पण, महाराष्ट्राचे होणारे नुकसान; महाराष्ट्रातील तरुणांना मिळणारी नोकरीची संधी दिवसेंदिवस हिरावून घेतली जात आहे. एक काळ असा होता की, देशातील कोणात्याही भागातील तरुणाने महाराष्ट्रात यायचे आणि २४ तासात त्याच्या पोटापाण्याची व्यवस्था ही महाराष्ट्राची माती करायची! या मातीचा गुणधर्मच होता की भारतातील कोणत्याही माणसाला महाराष्ट्राने उपाशी झोपू दिले नाही. आता मात्र या मातीतच जन्माला आलेल्या तरुणाईला उपाशी झोपावे लागत आहे. दिवसेंदिवस बेरोजगारीचा जो आलेख चढताच आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच इतकीही बेरोजगारी महाराष्ट्रात दिसत आहे. ही बाब नक्कीच चांगली नाही. उपाशीपोटी झोपणारी मुले आणि त्यांच्या भावना समजून घ्यायला हव्यात. राज्यकर्ते जर येथून जाणारे प्रकल्प–उद्योग थांबवू शकत नसतील तर त्यांचे ते मोठे अपयश आहे. असे आव्हाड म्हणाले. तसेच इंग्लडमध्ये फक्त महागाई झाली म्हणून अवघ्या ४५ दिवसात पंतप्रधानांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. एवढी संवेदनशीलता अपेक्षित नाही. पण, फॉक्सकॉन गेल्यानंतर आम्हाला मोठा प्रकल्प देण्यात येईल, असे आश्वासीत करण्यात आले होते. लहान मुलाला जसे चॉकलेटचे आमीष दाखविले जाते; तसेच आमीष फॉक्सकॉनच्या वेळी दाखविले होते. त्यावर आता काय उत्तर देणार? मात्र महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या वेदना तीव्र आहेत. एवढे मोठे प्रकल्प जर महाराष्ट्राच्या घशातून ओढले जात असतील तर महाराष्ट्राची अस्मिता, स्वाभिमान आणि प्रगतीवर फेकलेला दगड आहे. असेच म्हणावे लागले.

गुजरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीकडून हे प्रकल्प गुजरातला नेले जात आहेत का, असे विचारले असता,  निवडणुका होतात, त्याचा या विषयाशी काही सबंध आहे, असे आपणाला वाटत नाही. पण, आपल्या घरातून एखादा माणूस एखादी वस्तू घेऊन जातो. ही वस्तू घरातच राहिल, ही जबाबदारी कोणाची? महाराष्ट्राच्या घराची जबाबदारी ज्यांच्याकडे आहे; त्यांनी या सगळ्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत. ऐद्योगिक प्रगतीमध्ये १९५० नंतर किंवा त्याच्या आधीही उद्योग स्थापन व्हायला सुरुवात झाली. औद्योगिकीकरणात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकावर राहिले होते. आता अधोगतीला सुरुवात झाली आहे. एकेकाळी परराज्यातील मुलांना महाराष्ट्रात नोकरी मिळायची. आता अशी वेळ आली आहे की आपल्या राज्यातील मुलांना नोकरीसाठी परराज्याची वाट धरावी लागणार आहे, यापेक्षा मोठे दुर्दैव नाही, असे डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले.

प्रकल्प राज्याबाहेर जात असल्याने सत्ताधारी पक्षाचे प्रवक्ते महाविकास आघाडीवरच कापर फोडत आहेत, याबाबत विचारले असता, डॉ. आव्हाड यांनी, महाविकास आघाडीवर खापर फोडले जात असले तरी महाराष्ट्रातील जनता दुधखुळी नाही. महाविकास आघाडीचे सरकार जाऊन आता चार महिने होत आहेत आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार जर महाविकास आघाडीच्या चुका झाल्या असतील तर चार महिने तुम्ही काय झोपले होते का? आज तुमची दिल्लीमध्ये चलती आहे. त्यामुळे तुम्ही एअरबसच काय रॉकेट लाँचरचा प्रकल्प महाराष्ट्रात आणायला हवा होता, असे सांगितले. देशाची दिशा कशी बदलायची, यामध्ये काहीजण माहिर आहेत. ऐन निवडणुकीच्या काळात आपण किती धर्माचे आचरण करीत आहोत, हे दाखविण्यासाठी केजरीवाल यांनी हा मुद्दा उपस्थित केला. त्यांना माहित होते की यावरुन देशात वादळ उभे राहणार आहे. लोकांच्या पुढे प्रश्न महागाईचा आहे’ लोकांच्या पुढे बेरोजगारीचा आहे; महाराष्ट्रातील ओल्या दुष्काळाचा प्रश्न आहे. परतीच्या पावसाने राज्यात थैमान घातले आहे. शेतकरी जीवंत राहिल का, अशी चिंता वाटत आहे. असे अनेक प्रश्न असताना आपण कशावर चर्चा करतोय? एका धर्मनिरपेक्ष देशात काय असले पाहिजे, हे मी वेगळे सांगायला हवे का? पण, नसलेल्या विषयाचा ‘विषय’ निर्माण करुन लोकांना दुसर्या मार्गावर घेऊन जाण्याचे काम काही राजकीय मंडळी यश्वीरित्या करीत आहेत आणि आपणही त्यामध्ये सहभागी होतो, हे दुर्देवी आहे. आपले चलनच इतके खाली घसरत चालेलंय; त्यावर आपण बोललं पाहिजे. रुपयाची घसरत चाललेली किमंत आणि डॉलरची वाढत चाललेली किमंत ही देशाच्या दृष्टीने धोक्याचे आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. फोटो कुणाचा असावा, याच्यावर भाष्य करणे हास्यास्पद आहे.

# धामणसे येथे आनंदाचा शिधा वाटप

## धामणसे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचा पुढाकार



**रत्नागिरी** – दिवाळी निमित्ताने राज्यातील नागरिकांना देण्यात येणाऱ्या आनंदाचा शिधा या माध्यमातून चार जीवनावश्यक वस्तूंच्या वितरण राज्य सरकारच्या वतीने सर्वत्र होत आहे.रत्नागिरी तालुक्यातील धामणसे गावात धामणसे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था लिमिटेड धामणसे येथे आनंदाचा शिधा वाटप करण्यात आले

यावेळी सोसायटीचे चेअरमन श्रीकांत देसाई, सरपंच विलास पांचाळ, धान्य वाटप कमीटीचे अध्यक्ष दीपक जाधव, सोसायटीचे संचालक व भाजपा तालुका सरचिटणीस उमेश कुळकर्णी, दिलीप तांबे, सचिव सुनिल लोगडे, मापारी पाल्ये , श्री.पांचाळ उपस्थित राहून जातीने लक्ष ठेऊन आहेत. यावेळी सोसायटीचे चेअरमन श्रीकांत देसाई यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, चांगल्या प्रतीचा १ किलो रवा, १ किलो चणा डाळ, १ किलो साखर आणि १ लिटर पामतेल स्वस्त दरात १०० रुपयांमध्ये या चार ही वस्तूंचे वाटप सुरळीतपणे सुरू असून गावातील सर्व लाभधारकांना याचा लाभ मिळणार आहे.यामुळे सर्वसामान्य लोकांची दिवाळी आनंदमय जाणार आहे.

यावेळी भाजपा तालुका सरचिटणीस उमेश कुलकर्णी म्हणाले की, ग्रामीण भागात ही सर्वसामान्यपर्यंत व्यवस्थित आनंदाचा शिधा वाटप होत असून गावातील ४२५ कार्डधारक व्यक्तींना लाभ मिळणार आहे .ग्रामीण भागात दिवाळी यामुळे आनंदमय होत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व नागरी पुरवठा मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या सरकारने घेतलेला निर्णय नक्कीच कौतुकास्पद आहे.

# राष्ट्रीय अजिंक्यपद खो–खो स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे नेतृत्व रत्नागिरी जिल्ह्याच्या साक्षी लिंगायत, मृण्मयी नागवेकर, अथर्व गराटे करणार

**रत्नागिरी :** फलटण (जि. सातारा) येथे होणार्या ३२ व्या किशोर–किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो–खो स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाचे नेतृत्व रत्नागिरी जिल्ह्याच्या साक्षी लिंगायत, मृण्मयी नागवेकर आणि अर्थव गराटे करणार आहेत. रत्नागिरीतील शिर्के प्रशालेचे क्रीडा शिक्षक विनोद मयेकर यांची मुलांच्या संघाच्या व्यवस्थापकपदी नियुक्ती झाली आहे. रत्नागिरी येथे मागील आठवड्यात झालेल्या राज्यस्तरीय खो–खो स्पर्धेत जिल्ह्याच्या मुलांच्या संघाने पाचवे तर मुलींच्या संघाने तिसरे स्थान पटकावले. या निवड चाचणी स्पर्धेतून महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्यात आला. मुलींच्या गटामध्ये साक्षी लिंगायत, मृण्मयी नागवेकर यांनी उपांत्यपुर्व फेरीच्या सामन्यात उस्मानाबाद विरुध्द तर उपांत्य फेरीच्या सामन्यात ठाणे विरुध्द चमकदार कामगिरी केली. उस्मानाबादविरोधात साक्षीने उत्कृष्ट संरक्षण करत रत्नागिरीला विजय मिळवून दिला होता. मुलांच्या गटामध्येही उपांत्यपुर्व फेरीमध्ये पुणे विरुध्दच्या सामन्यात अर्थव गराटेने अष्टपैलु कामगिरी केली होती.

# अनाथांना शिधापत्रिका वितरणासाठी विशेष मोहीम

**रत्नागिरी (प्रतिनिधी) :** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातर्फे अनाथ आणि निराधारांना शिधापत्रिका वितरित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याकरिता ३१ डिसेंबरपर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा पुरवठा विभागातर्फे केले आहे. अनाथांना वयाच्या २८ वर्षापर्यंत तात्पुरती पिवळी शिधापत्रिका वितरित करून प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत लाभ देण्यात येणार आहे. यासाठी महिला व बालविकास विभागाने वितरित केलेले अनाथ प्रमाणपत्र किंवा आई, वडील यांचे मृत्यू प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा, आधारकार्ड, बँक पासबूक, बालगृह, निरीक्षणगृह अनुरक्षणगृह आदी संस्थेच्या अधीक्षकांचे संस्थेत वास्तव्याचे प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा, शहरी भागात नगरसेवक व ग्रामीण भागात सरपंच, उपसरपंच यांचे रहिवासी प्रमाणपत्र आवश्यक आहे.

# आगरनरळ येथे एसटीची रिक्षाला धडक

**रत्नागिरी :** आगरनरळ येथे एसटीची रिक्षाला धडक बसून अपघात झाला. यात रिक्षातील ६ जण जखमी झाले असून सुनील जोगदंड असे जयगड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या एसटी चालकाचे नाव आहे. त्याच्या विरोधात महेंद्र पांडुरंग ठोंबरे (३८, रा. आगरनरळ, रत्नागिरी) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार, दुपारी ते आपल्या ताब्यातील रिक्षा (एमएच–०८–ई–७८३७) मधून आपल्या कुटुंबाला घेऊन खंडाळा ते आगरनरळ जात होते. त्याचवेळी सुनील जोगदंड एसटी (एमएच–१४–बीटी–००१३) घेऊन देऊडमार्गे जाकादेवी ते आगरनरळ असा भरधाव वेगाने जात होता. एसटी अतिवेगाने जात असल्याचे पाहून ठोंबरे यांनी आपली रिक्षा रस्त्याच्या डाव्या बाजूला कच्च्या साईड पट्टीवर घेतली. परंतु सुनीलचा एसटीवरील ताबा सुटला. त्याने एसटी डाव्या बाजूला घेतल्याने डोंगराला धडक बसून एसटी तिरकी झाल्याने तिच्या मागील बाजूची धडक रिक्षाला बसली. त्यामुळे रिक्षा पलटी झाली.

# नागपूर–मडगाव–नागपूर विशेष साप्ताहिक गाडीस संगमेश्वर रोड थांबा मिळविण्याच्या मागणीला यश

**संगमेश्वर**–नागपूर–मडगाव–नागपूर विशेष साप्ताहिक गाडी गणपती उत्सवाच्या काळात सुरू झाली त्यावेळी संगमेश्वर रोड रेल्वे स्टेशन थांबा होता. गणपती नंतर ही गाडी कायमची करणार अशी चर्चा सुरू झाल्यानंतर संगमेश्वर रोड स्थानकाचा थांबा रद्द करण्यात आला. संदेश जीमन यांनी कोकण रेल्वेच्या विविध विभागांशी पत्र व्यवहार करून हा प्रश्न उच्च स्तरावर मांडला. कोकण रेल्वेच्या बेलापूर येथील मुख्यालयात सीएमडी संजय गुप्ता यांना त्या संदर्भातील पत्रही दिले, तसेच चिपळूण– संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांच्याशी चर्चा केली. या सर्व प्रयत्नांना यश येऊन कोकण रेल्वेने नवीन आध्यादेश काढला.

नोव्हेंबरपासून नागपूर–मडगाव–नागपूर या द्वि–साप्ताहिक गाडीला संगमेश्वर रोड रेल्वे स्थानकावर थांबा देण्यात आला आहे. तरी सर्व संगमेश्वरवासीय प्रवाशांनी या साप्ताहिक गाडीचे जास्तीत जास्त आरक्षण करून त्याचा लाभ घ्यावा. जेणे करून मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन थांबा कायमस्वरुपी ठेवता येईल.

# दुचाकी विकण्याच्या बहाण्याने ४० हजाराची ऑनलाईन फसवणूक

**रत्नागिरी (प्रतिनिधी)** – दुचाकी विकण्याच्या बहाण्याने तरुणाकडून वेळोवेळी असे ४० हजार रुपये घेऊन ऑनलाईन फसवणूक केली. याप्रकरणी एका विरोधात ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ही घटना २७ ते २८ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत हातखंबा येथे घडली आहे. हंसराज हनुमंत कदम असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे.त्याच्याविरोधात आदित्य वामन कळंबटे (२१,रा.झरेवाडी हातखंबा, रत्नागिरी ) यांनी तक्रार दिली आहे.त्यानुसार,कदमने आदित्य कळंबटे यांना फोन करून होंडा शाईन दुचाकी विकायची असल्याचे संगितले.तसेच डिलिव्हरी चार्जेस म्हणून प्रथम १५५० रुपये भरण्यास सांगून वेळोवेळी पैसे मागितले. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन आदित्यच्या भावाने एकूण ४० हजार रुपये गुगल स्कॅनरने कदमला पाठवले. परंतु त्यानंतर गाडीबाबत विचारणा केली असता कदमने उडवाउडवीची उत्तरे देऊन फसवणूक केली.अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शेळके करत आहेत.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने दापोलीत बौद्धाचार्य शिबिराला प्रारंभ



**रत्नागिरी :** भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा शाखा रत्नागिरी यांचे विद्यमाने रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यामधील वणंद येथे माता रमाई राष्ट्रीय स्मारक याठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या निवासी बौद्धाचार्य श्रामनेर शिबिराला मंगळवार २५ ऑक्टोबर पासून प्रारंभ झाला. या शिबिरात भिक्षु संघाचे अध्यक्ष तथा चैत्यभूमीचे व्यवस्थापक पूज्य भंते बी संघपाल महाथेरो हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहिले असून त्यांचे मौलिक मार्गदर्शन शिबिरार्थी लाभणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन रत्नागिरी दापोलीतील माता रमाई राष्ट्रीय स्मारक वणंद येथे प्रमुख मार्गदर्शकांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी हा उद्घाटन कार्यक्रम आणि संपूर्ण शिबिर भारतीय बौद्ध महासभा रत्नागिरी जिल्हा शाखेचे अध्यक्ष अनंत सावंत यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व अध्यक्षतेखाली घेण्यात येत असून या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक संस्कार विभागाचे सचिव प्रा. अल्पेश सकपाळ, जिल्हा कार्यालयीन सचिव प्रदीप जाधव, आदींसह दापोली तालुका शाखेचे अध्यक्ष संदीप धोंत्रे, शाखेचे दीपक धोंत्रे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या शिबिरात एकूण २७ शिबिरार्थी सहभागी झाले असून या सर्व शिबिरार्थींना बौद्ध धम्मातील गाथा व धार्मिक विधीसंदर्भात अतिशय मौलिक मार्गदर्शन पूज्य भंते बी संघपाल यांचेमार्फत लाभणार आहे. सदर शिबिर मंगळवार दिनांक २५ ऑक्टोबर ते सोमवार दिनांक ३ नोव्हेंबर या दहा दिवशीय कालावधीत निवासी स्वरूपात घेण्यात येणार असून या शिबिरात सहभागी झालेल्या शिबिरार्थींची लेखी परीक्षा घेऊन संबंधित शिबिरार्थींना बौद्धाचार्य सनदकार्ड व प्रमाणपत्र वितरित केली जाणार असल्याची माहिती रत्नागिरी जिल्हा शाखा भारतीय बौद्ध महासभेच्या आयोजकांकडून देण्यात आली. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी रत्नागिरी जिल्हा शाखेचे अध्यक्ष अनंत सावंत यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे सर्व प्रमुख पदाधिकारी पदाधिकारी आणि बौद्धाचार्य, श्रामणेर मेहनत घेत आहेत.

# वीज मिळाली, पाणी मिळाले; वस्तीला नवी ओळख मिळाली

## आ. संजय केळकर यांच्या सहवासात कष्टकरी वस्तीने साजरी केली दिवाळी

**ठाणे:** ठाणे आणि मुंबईच्या वादात अडकलेल्या कष्टकरी समाजाच्या लोकांच्या वस्तीत आमदार संजय केळकर यांनी वीज आणली. आता या वस्तीला पाण्याची जोडणी मिळाल्याने खऱ्या अर्थाने येथील रहिवाशांची दिवाळी गोड झाली आहे. आपल्या मतदारसंघात ही वस्ती नसतानाही केळकर यांनी माणुसकीचे दर्शन घडवत एका वंचित वसाहतीला ओळख मिळवून दिल्याने कौतुक होत आहे.

ठाण्यातील कशिश पार्क येथील जुना तबेला येथे २५ कुटुंबे गेल्या ३५ वर्षांपासून रहात आहेत. ही वस्ती मुंबईच्या हद्दीतील आहे कि ठाण्याच्या हद्दीतील आहे याचा वाद सुरु असल्याने ही कुटुंबे मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित होती. काहीही पुरावे नसल्याने त्यांना वीज जोडणीही मिळत नव्हती. येथील रहिवाशांनी आमदार संजय केळकर यांची भेट घेतली. आ. केळकर यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून तातडीने पावले उचलली. मतदार संघात ही कुटुंबे येत नसल्याने आमदार निधी वापरता येत नव्हता, त्यामुळे त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून तोडगा काढला. जिल्हा प्रशासनाने महावितरणकडे आवश्यक तो निधी वर्ग केला आणि केबल, वीज मीटरचा प्रश्न मार्गी लागला. चार वर्षांनंतर पुन्हा या वस्तीची दिवाळी गोड होत आहे. आमदार संजय केळकर यांच्या प्रयत्नाने या वस्तीला नवीन पाण्याची जोडणी मिळाली असून त्यांच्या हस्ते याचे मंगळवार, २५ ऑक्टोबर रोजी उद्घाटन करण्यात आले. यावेळी मृणाल पेंडसे, राष्ट्रीय सर्व श्रमिक संघाचे प्रशांत जाधव, वार्ड अध्यक्ष सोनी चव्हाण, पूजा गंद्रे, जय कोकणे, किरण धतुरे, प्रमोद चव्हाण आणि रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आ.केळकर यांच्या हस्ते दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.



# ठाण्यात उद्धव ठाकरेंचे 'महाराष्ट्र योद्धा' असे लावलेले बॅनर महापालिकेने उतरवले




**ठाणे:** वागळे इस्टेट परिसरातील राजकीय विरोध असलेले आणि नुकताच शिवसेनेत प्रवेश करणारे संजय घाडीगावकर यांनी ठाण्यात उद्धव ठाकरे यांच्या समर्थनार्थ लावलेले 'महाराष्ट्र योद्धा' अशा आशयाचे बॅनर महापालिकेने काही तासांच्या आता म्हणजे गुरुवारी उतरवले. त्यामुळे ठाकरे आणि शिंदे यांच्यातील वाद पुन्हा एकदा समोर आला आहे. दरम्यान यावर बोलताना घाडीगावकर यांनी ठाण्यातील सत्ताधारी शिवसेनेला घाबरली असल्याचा आरोप केला आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या समर्थनार्थ नुकतेच शिवसेनेत प्रवेश केलेल्या संजय घाडीगांवकर यांनी संपूर्ण ठाणे शहरात 'महाराष्ट्र योद्धा' आशयाचे लावले होते. या बॅनरमध्ये घाडीगांवकर यांनी उद्धव ठाकरे यांचा 'महाराष्ट्र योद्धा' म्हणून उल्लेख केला होता, तसेच उद्धव ठाकरे हेच बाळासाहेबांचे संघर्षमय विचारांचे खरे वारसदार असल्याचे म्हटले होते. दिल्लीश्वरांसमोर न झुकणारा,न वाकणारा महाराष्ट्र योद्धा अशा आशयाची ही पोस्ट आहे.अन्याया विरुद्ध संघर्ष हाच बाळासाहेब ठाकरे यांचा विचार उद्धव ठाकरे पुढे घेऊन जात असून दिल्लीश्वरांसमोर न झुकता महाराष्ट्राचा स्वाभिमानी बाणा उद्धव ठाकरे दाखवून देत असल्याचे त्या बॅनरमध्ये नमूद केले होते.दिल्लीश्वरांच्या अन्यायकारक महाशक्तीला प्रखरपणे विरोध करण्याचे धाडस फक्त उद्धव ठाकरे दाखवत असल्याचे या बॅनर मधून सूचित करण्यात आले होते.महाराष्ट्राचा स्वाभिमान जपणाऱ्या उध्दव ठाकरे यांच्या सोबत महाराष्ट्र प्रेमी जनता ठामपणे उभी आहे असेही घाडीगांवकर यांनी या बॅनर मध्ये म्हटले होते हे बॅनर लावल्यानंतर काही तासातच महापालिका प्रशासनाने उतरवले आहेत.

> ***ठाण्यातील सत्ताधारी हे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला घाबरले आहे. त्यामुळेच हे बॅनर उतरविण्यात आले आहेत.***
> ***– संजय घाडीगांवकर***

> ***दिवाळी दरम्यान शहरात लावण्यात आलेले बॅनर काढण्याची नियोजित कारवाई सध्या सुरू आहे. ही कारवाई दिवाळी संपल्याने तातडीने हाती घेतलेली आहे.***
> ***– गजानन गोदापुरे, उपायुक्त, अतिक्रमण विभाग,ठामप***

# ठाणे महापालिकेत शिपायाला लाचखोरी पडली महागात!

**ठाणे:** समाजमाध्यम किती प्रभावी असते, याचा प्रत्यय ठाणे महापालिकेतील एका शिपायाला आलाच आहे. त्याचबरोबर आता त्याच्या निलंबनाची कारवाई झाली आहे. तर, त्याच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आली आहे. मुलगी झाल्यानंतर जन्म दाखला घेण्यासाठी गेलेल्या महिलेच्या पतिकडे चक्क ५०० रुपयांची मागणी करत ते पैसे घेतले. त्यामुळे संतापलेल्या त्या महिलेने आपला संताप समाजमाध्यमांवर व्यक्त केला. हाच व्हायरल प्रकार महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या लक्षात येताच त्यांनी वरील कारवाई केल्याची माहिती सूत्रांनी दिली. यापूर्वी आयुक्तांनी महापालिका मुख्यालयाच्या आवारात पिचकारी मारणाऱ्या रिक्षाचालक कर्मचाऱ्याला नियमानुसार दंडात्मक कारवाई करत त्याची रीतसर पावती त्या कर्मचाऱ्याच्या हातावर ठेवलेली आहे.

तक्रारदार महिला ही ठाण्याच्या घोडबंदर भागात वास्तव्यास आहे. त्यांना मध्यंतरी मुलगी झाली तिचा जन्म दाखला आणण्यासाठी त्या महिलेचे पती कावेसर येथील उपकार्यालयामध्ये गेले होते. त्यावेळी त्यांनी जन्म दाखल्याच्या दहा प्रति देण्याची मागणी करून त्याप्रमाणे कार्यालयात शुल्काचा भरणा ही केला. मात्र या कार्यालयामध्ये जन्म दाखला देण्याची जबाबदारी एका शिपायावर सोपविण्यात आली होती. याचदरम्यान त्या शिपायाने जन्म दाखल्याच्या प्रती देण्यासाठी त्यांच्याकडे चक्क ५०० रुपयांची मागणी केले. पैसे कशासाठी द्यायचे, अशी विचारणा करताच, मुलगी झाल्याच्या आनंदात बक्षीस म्हणून पैसे मिळावे असा तगादा लावला. कंटाळून त्या महिलेच्या पतीने त्या शिपायाला पैसे देऊ केले. जन्म दाखला घेऊन घरी आल्यावर झालेला प्रकार महिलेच्या कानावर पडताच त्या संतापल्या. त्यांनी आपला संताप समाजमाध्यमांवर व्यक्त करत तो संदेश व्हायरल केला. हीच बाब महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या निर्दशनास आल्यावर त्यांनी त्या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत, उपायुक्तांना याप्रकरणी कारवाई करण्याचे आदेश दिले. मग महापालिका अधिकाऱ्यांनी त्याची सत्यता पडताळणी केली. पैसे घेतल्याची बाब पुढे आल्यावर आयुक्तांच्या निर्देशानुसार त्या शिपायाला निलंबित केले तर, उपकार्यालयीन अधिक्षक आणि लिपीक या दोन अधिकाऱ्यांना याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.

# शिर्डीत राष्ट्रवादीचे अभ्यास शिबिर

**ठाणे :** महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने येत्या ४ आणि ५ नोव्हेंबर २०२२ रोजी शिर्डी येथे राज्यातील प्रमुख कार्यकर्त्यांसाठी राष्ट्रवादी मंथन : वेध भविष्याचा या दोन दिवसीय अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह कृषी, विज्ञान, अर्थ, संरक्षण, पत्रकारिता आदी क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा माजी मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

देशासमोर, राज्यासमोर अनेक प्रश्न असताना व्हाट्सअप युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून चुकीची माहिती प्रसारित करुन लोकांना संभमित करण्याचे प्रयत्न सत्ताधा-यांकडून केले जातात. या पार्श्वभूमीवर विविध प्रश्नांसंदर्भातील नेमके वास्तव काय आहे, त्यासंदर्भातील नेमकी आव्हाने कोणती आहेत आणि त्यांना सामोरे कसे जाता येईल यासंदर्भातील मंथन शिबिरामध्ये करण्यात येणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या राष्ट्रवादी मंथन : वेध भविष्याचा' या शिबिरामध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजितदादा पवार, खा. सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह पक्षाचे ज्येष्ठ नेते, राज्यातील विविध क्षेत्रातील विचारवंत, अभ्यासक,कृषी, विज्ञान, अर्थ, संरक्षण, पत्रकार आदी महनिय व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत.



# शिवसेनेचे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांची किसन नगर भागातील घाडीगांवकर यांच्या कार्यालयाला भेट

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी शनिवारी किसन नगर येथील शिवसेनेच्या कार्यालयाला भेट दिली.जुन्या जाणत्या शिवसैनिकांशी संवाद साधला.यावेळी केदार दिघे यांचा कार्यकर्त्यांच्या वतीने संजय घाडीगांवकर यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.





दिव्यातील म्हात्रे गेट येथे राज्य सरकारच्या वतीने नागरिकांना दिवाळी निमित्त देण्यात आलेल्या आनंदाचा शिधा उपक्रमाचे साहित्य वाटप दिवा भाजप महिला मंडळ अध्यक्षा ज्योती पाटील व राजश्री मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्र सरकारची शिधापत्रिका धारकांना दिवाळी भेट म्हणून प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर व तेल केवळ शंभर रुपयांत देण्यात आले. त्याप्रसंगी रेशनिंग विभागाचे अधिकारी भाजपा महिला अध्यक्षा सौ.ज्योती राजकांत पाटील म्हात्रे गेट वार्ड अध्यक्ष श्री नागेश पवार सौ राजश्री रोहिदास मुंडे आदी उपस्थित होते.







श्री छत्रपती शंभुराजे संघटना दिवा शहर यांच्या वतीने दिवाळी पहाट कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाचे आयोजन राजेश पाटील यांनी केले होते. या कार्यक्रमाला ज्योती पाटील उपस्थित होत्या.